No. 026

# CS (MAIN) EXAM, 2010

D-DTN-K-NSA

## MARATHI

### Paper I

### (Literature)

*Time Allowed : Three Hours* | *Maximum Marks : 300*

***INSTRUCTIONS***

***Candidates should attempt questions no. 1 and 5 which are compulsory, and any THREE of the remaining questions, selecting at least ONE question from each Section.***

***The number of marks carried by each question is indicated at the end of the question.***

***Answers must be written in Marathi.***

## SECTION A

1. पुढीलपैकी कोणत्याही ***तीन*** प्रश्नांची उत्तरे सुमारे दोनशे शब्दांत लिहा : *20×3=60*

   (a) 'भाषण' (speech) आणि 'भाषा' (language) हा भेद उलगडून दाखवा.

   (b) समाज, संस्कृती आणि भाषा यांतील परस्परसम्बन्ध स्पष्ट करा.

   (c) कारकार्थ व उपपदार्थ यांतील फरक सांगा.

   (d) खेड्यापाड्यांतील जत्रेत होणारा 'तमाशा' आणि शहरांतील नाट्यगृहांत होणारे 'वगनाट्य' यांतील फरक वर्णन करा.

2. लिंग, वचन आणि पुरुष यांच्यामुळे विकारी शब्दांत कसे बदल होतात, ते सोदाहरण स्पष्ट करा. *60*

3. अहिराणी बोलीची भाषिक वैशिष्ट्ये वर्णन करा. *60*

4. जातककथांचा प्रभाव लोककथांवर कसा आहे, त्याची चिकित्सा करा. *60*

## SECTION B

5. पुढीलपैकी कोणत्याही ***तीन*** प्रश्नांची उत्तरे सुमारे दोनशे शब्दांत लिहा : *20×3=60*

   (a) महानुभावीय गद्याच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये सांगा.

   (b) मराठी कथेच्या विकासक्रमातील टप्पे सांगा.

   (c) दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कवितेतील आधुनिकतेची चर्चा करा.

   (d) विजय तेंडुलकरांच्या 'कमला' या नाटकाची स्त्रीवादी समीक्षा करा.

6. "पंडित कवींच्या काव्यात इथूनतिथून नुसती कृत्रिम कारागिरीच भरलेली आहे" हे विधान तुम्हाला पटते का ? मराठी कवितेमध्ये पंडित कवींचे योगदान काय आहे, असे तुम्हाला वाटते ? *60*

7. "साहित्यकृतीचे स्वरूप तिच्या प्रयोजनावर अवलंबून असते" या विधानाचे परीक्षण करा. *60*

8. दलित साहित्याच्या मूल्यमापनासाठी वेगळ्या स्वतंत्र साहित्यशास्त्राची आवश्यकता आहे काय, याविषयी साधकबाधक चर्चा करा. *60*